मराठी वृत्तपत्रातील गुन्हे वार्तांकनाचा संवादशास्त्रीय अभ्यास (दै.लोकमत, दै.सकाळ, दै.महाराष्ट्र टाईम्स्च्या विशेष संदर्भात)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या आंतरविद्याशास्त्रीय अभ्यास विद्या शाखांतर्गत पीएच्.डी. (जनसंवाद व वृत्तपत्रविद्या) पदवीसाठी सादर करावयाचा शोधप्रबंधाचा प्राथमिक आराखडा

संशोधक

शुद्धोधन शंकरराव एडके

मार्गदर्शक

डॉ.राजेंद्र नारायणराव गोणारकर

सहयोगी प्राध्यापक,

माध्यमशास्त्र संकुल,

स्वा.रा.ती.म.विद्यापीठ, नांदेड

संशोधन केंद्र

माध्यमशास्त्र संकुल

स्वा.रा.ती.म.विद्यापीठ, नांदेड

ऑगस्ट २०२१

मराठी वृत्तपत्रातील गुन्हे वार्तांकनाचा समाजशास्त्रीय अभ्यास (दै.लोकमत, दै.सकाळ, दै.महाराष्ट्र टाईम्स्च्या विशेष संदर्भात)

१.२ प्रस्तावना :-

भारतात मुद्रण कलेचा प्रवेश १६ व्या शतकात झाला. तेव्हाच भारतीय वृत्तपत्र सृष्टीचे अप्रत्यक्षपणे बीजारोपण झालेले दिसते. पण प्रत्यक्षात अंकुरण रुप उभे राहण्यास बराच कालावधी लागला. वृत्तपत्रे व मुद्रणकला यांचा संबंध घनिष्ट असल्याने मुद्रणकला विकसित होऊन तिचा प्रसार झाला नसता, कारण वृत्तपत्रांना आजचे महत्त्वाचे स्थान लाभले नसते. भारतात मुद्रणाचा प्रारंभ १६ व्या शतकात झाला असला तरी त्या कलेचा गती मिळाली ती १८ व १९ व्या शतकात. मुद्रणकला येथे अवतीर्ण होऊन दोनशे वर्षांचा काळ लोटल्यावर वृत्तपत्रे निघाली. तर तिचा सार्वत्रिक प्रसार होण्यास १९ व्या शतकाचे ३ रे दशक उजाडावे लागले. भारतीय पत्रकारितेचा प्रारंभ हा व्यावसायिक लिखाण व नफा कमाविणे नव्हता तर तत्कालीन राजकीय व सामाजिक अवस्थेवर प्रहार करणे हा होता. १९ व्या शतकात जेव्हा पत्रकारितेला सुरुवात झाली, तेव्हापासून गुन्हेगारी जगतातील बातम्या तेवढ्या प्रमाणात दिल्या जात नव्हत्या. जेवढ्या आज दिल्या जातात. वृत्तपत्राच्याच सामाजिक बांधिलकी व तत्त्वाविषयी यदुनाथ थत्ते म्हणतात, "लोकशाही वृत्तपत्राची व पत्रकाराची भूमिका ही शिक्षकाची असते. जगातील श्रेष्ठ शिक्षणतज्ज्ञ शिक्षणाची व्याख्या शिकवणे म्हणजे विचार करायला लावणे असे सांगतात." अर्थात वृत्तपत्राची भूमिका ही जशी शिक्षकाची असते तशीच ती गुन्हेगारी जगतातील गुन्हेगारी शोधून काढणे व त्या संदर्भात शासनकर्त्यांना गुन्हेगाराची दखल घेण्यास भाग पाडणे. ही भूमिका देखील वृत्तपत्रे घेत असतात.

दि.६ जानेवारी १८३२ मध्ये बाळशास्त्री जांभेकर यांनी 'दर्पण' नावाचे वृत्तपत्र सुरु केले. या वृत्तपत्राला पत्रकारितेची गंगोत्री मानली जाते. कारण वृत्तपत्र हे वाचकांच्या

जीवनाशी, त्यांच्या विचाराशी, ध्येयाशी, सामान्य गरजा व त्यांचे प्रश्न अशा वेगवेगळ्या प्रसंगाशी समरस असते. प्रस्तुत प्रबंधात दैनिक सकाळ, दैनिक लोकमत व दैनिक महाराष्ट्र टाईम्स् या दैनिकातील गुन्हेगारी संदर्भातील वार्तांकनाचा संवादशास्त्रीयदृष्ट्या अभ्यास करण्यात येणार आहे. महाराष्ट्रात मराठीमध्ये अनेक वृत्तपत्रे सुरू झाली त्यामध्ये 'ज्ञानप्रकाश' १८४९ हे मराठीतील पहिले दैनिक होते. 'विचारलहरी' १८५२ रोजी पुण्यातील काही विद्वानांनी एकत्र येऊन सुरु केले. महाराष्ट्रामध्ये या व्यतिरिक्त सामाजिक चळवळीसाठी अनेक वृत्तपत्रे निर्माण झाली. त्यामध्ये महात्मा फुले यांचे 'दीनबंधू', गोपाळ गणेश आगरकर व बाळ गंगाधर टिळक यांचे दैनिक 'केशरी' व 'मराठा', डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे 'मूकनायक' हे वृत्तपत्र दि.३१ जानेवारी १९२० ला सुरू केले. प्र.के.अत्रे यांनी संयुक्त महाराष्ट्र चळवळ चालविण्यासाठी 'नवयुग' व 'मराठा' हे दैनिक सुरू केले. इ.स.१९४८ च्या नंतर मराठी वृत्तपत्रांचा विशेष विकास झाल्याचे दिसून येते. इ.स.१९६० पर्यंत अनेक वृत्तपत्रे महाराष्ट्रात सुरु झाली.

प्रस्तुत शोधप्रबंधात गुन्हेगारी जगतातील वार्तांकनाचा अभ्यास करण्यात येणार आहे दैनिक सकाळची निर्मिती जानेवारी १९३२ मध्ये झाली. हे वृत्तपत्र डॉ.नानासाहेब पुरोळेकर यांनी पुण्यात सुरु केले. सकाळ हे महाराष्ट्रातील आघाडीचे वृत्तपत्र आहे. तर दैनिक लोकमत हे जवाहरलाल दर्डा यांनी ९ जानेवारी १९८१ रोजी सुरू केले. दैनिक महाराष्ट्र टाईम्स् हे वृत्तपत्र १८ जून १९६२ रोजी सुरू झाले. सदरील वृत्तपत्रांच्या माध्यमातून गुन्हेगारी संदर्भातील वार्तांकनाचा अभ्यास प्रस्तुत शोधप्रबंधात करण्यात येणार आहे.

महाराष्ट्रातील वृत्तपत्राची परंपरा ही बाळशास्त्री जांभेकर, आगरकर, खांडीलकर, टिळक, कोल्हाटकर, परांजपे यांसारख्या मोठ्या राजकीय सामाजिक विचारवंतांशी जोडलेली आहे. प्रस्तुत संशोधनात दैनिक सकाळ, दैनिक लोकमत आणि दैनिक महाराष्ट्र टाईम्स् या वृत्तपत्रांनी गुन्हेगारी जगतामध्ये केलेल्या वार्तांकनाचा अभ्यास करण्यात येणार

आहे. आधुनिक वृत्तपत्राचे वर्णन परिपूर्ण वृत्तपत्र असे केले जाते. मानवी जीवनामधील अनंत पैलू या वृत्तपत्रामध्ये उमटताना दिसतात. प्रसिद्ध विचारवंत प्रा.जॉन हेगेनबर्ग यांच्या मते, "वृत्तपत्रे आपल्या माध्यमातून जनतेची सेवा करतात. जनसेवा पत्रकारिता हा नवा प्रवाह असून, तो वर्धिष्णू प्रवाह आहे." विविध सामुग्रीचा समाजजीवनावर पडणारा प्रभाव हा पत्रकारितेच्या दृष्टीने एक महत्त्वाचा पैलू आहे. गुन्हे वार्तांकनाच्या बाबतीमध्ये बातमी असो, संपादकीय अग्रलेख असो की स्तंभलेख असो किंवा शोधक वृत्त अन्वेषण असो या सर्वांच्या माध्यमातून गुन्हेगारीला आळा बसवण्याचे काम केले जाते. गुन्हेगारी वार्तांकन हे एक विशेष महत्त्वाचे क्षेत्र म्हणून उदयाला येत आहे. या क्षेत्राचा सुक्ष्मरितीने व बारकाईने अभ्यास केला असता, त्याचा समाज जीवनावर होणारा परिणाम व होणारा संवाद याचा अभ्यास प्रस्तुत शोधप्रबंधात करण्यात येणार आहे.

तसेच, गुन्हे वार्तांकनाच्या प्रभावाचे शास्त्रीय दृष्टीने विश्लेषण करणे शक्य होणार आहे. हे शास्त्रीय विश्लेषण करणे हा या संशोधनाचा केंद्रबिंदू आहे. आधुनिक वृत्तपत्रामध्ये समाज जीवनाचे नियमन करण्याची शक्ती आहे. पूर्वी वृत्तपत्राचे काम सांगावा, सांगण्याच्या रुपात व्यक्ती करत असत, परंतु अलिकडच्या काळात विविध वृत्तपत्रांच्या माध्यमातून गुन्हेगारी जगतातील वार्तांकन करण्याचे काम वर्तमानपत्रे करत आहेत. गुन्हे वार्तांकनाला मराठी वृत्तपत्रात 'ज्ञानप्रकाश', 'सकाळ' या वृत्तपत्रांनी सुरुवात केली. अलिकडे 'महाराष्ट्र पोलीस टाईम्स' या वृत्तपत्रात गुन्हेगारीसंबंधी वार्तांकन मोठ्या प्रमाणात दिसून येते नव्हे तर हे वृत्तपत्र गुन्हेगारी संदर्भातच वार्तांकन करून जनतेशी संवाद साधत आहे. 'महाराष्ट्र पोलीस टाईम्स्' सारख्या गुन्हे वार्तांकन करणाऱ्या वृत्तपत्राची सुरुवात १९८० च्या दशकात झाली. १९८० च्या नंतर भारतामध्ये मोठ्या प्रमाणात वाढती गुन्हेगारी, वाढते शहरीकरण, वाढते औद्योगिकीकरण, वाढती लोकसंख्या यामुळे मोठ्या प्रमाणात गुन्ह्यांच्या प्रकरणात वाढ झाली. त्यामुळे वृत्तपत्रामध्ये गुन्हेगारी संदर्भातील वार्तांकनालादेखील महत्त्व प्राप्त झाले.

गुन्हेगारीचे वार्तांकन करताना संबंधित वार्ताहरास कायद्याचे ज्ञान असणे अत्यंत आवश्यक आहे. कारण, सदरील वार्तांकन करताना कायदा हातात घेऊन कुठलेही वार्तांकन करता येत नाही. जेणेकरुन संबंधित व्यक्तीच्या मानवी हक्काचे हनन होणार नाही. म्हणून जोपर्यंत गुन्हेगारावर गुन्हा नोंदला जात नाही तोपर्यंत संबंधित व्यक्तीला गुन्हेगार म्हणून वार्तांकनाच्या माध्यमातून प्रस्तुत करता येत नाही. म्हणून गुन्हेगारी विषयीच्या बातम्या मिळवताना कायद्याचा अभ्यास करणे हे वृत्तपत्राच्या व वार्ताहराच्या दृष्टीने महत्त्वाच्या आहेत. त्यामध्ये इ.स.१८६० चा कायदा आणि इ.स.१९७३ चा कायदा या दोन कायद्याचा अभ्यास करणे वार्ताहरासाठी अत्यंत गरजेचे आहे.

दैनिक सकाळ, महाराष्ट्र टाईम्स, दैनिक लोकमत यांसारख्या वृत्तपत्रांनी देखील गुन्हे वार्तांकनाला प्राधान्य दिले आहे. कारण, गुन्हे वार्तांकनाचा समाजावर पडणारा प्रभाव हा दुहेरी स्वरुपाचा असतो. एकीकडे ह्या बातम्यांपासून लोक सावध होतात तर दुसरीकडे याचा फायदा घेऊन गुन्हेगारीमध्ये वाढही होताना दिसते. कारण, कळत न कळत तरुण पिढी त्याचे अंधानुकरण करताना दिसते. त्यामुळे अशा बातम्या देताना पत्रकारांनी शांत व संशम आणि समतोल दृष्टिकोन ठेवणे फार महत्त्वाचे असते. हे लक्षात घेऊन या संधोनासाठी 'मराठी वृत्तपत्रातील गुन्हे वार्तांकनाचा समाजशास्त्रीय अभ्यास' (दै.लोकमत, दै.सकाळ, दै.महाराष्ट्र टाईम्सच्या विशेष संदर्भात) हा विषय निवडला आहे. तसेच या विषयाचे विश्लेषण शास्त्रीय दृष्टिकोनातून करण्यावर भर दिला जाणार आहे त्यामुळे हे संशोधन नवी दृष्टी देण्याचे काम करेल अशी आशा आहे.

१.२ अभ्यासाची गरज (Need of Research) :-

प्रस्तुत विषयाचे संशोधन करत असताना समाजातील वाढत्या गुन्हेगारीला आळा बसण्यासाठी व सामान्य जनतेचे विविध गुन्ह्यांपासून रक्षण करण्यासाठी सदरील संशोधन महत्त्वाचे ठरणार आहे. वाढते शहरीकरण, वाढती लोकसंख्या यामुळे मोठ्या प्रमाणात

गुन्हेगारी वाढत आहे. या गुन्हेगारीचे वार्तांकन करणे प्रसार माध्यमांच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. वर्तमानपत्रातील गुन्हे वार्तांकन करताना वार्ताहरांनी शहरी व ग्रामीण पोलीसांच्या संपर्कात राहणे महत्त्वाचे आहे. यातून गुन्हेगारी जगतातील महत्त्वाच्या बातम्या मिळतात.

हे संशोधन करताना गुन्हे वार्तांकनाच्या सामाजिक परिणामाचा अभ्यास करण्यात येणार आहे. वाढते शहरीकरण, औद्योगिकीकरण यामुळे गुन्ह्यामध्ये देखील मोठ्या प्रमाणात वाढ होतांना दिसत आहे. खून, दरोडे या घटना मोठ्या प्रमाणात घडत असतात यातून जनतेचे रक्षण करण्यासाठी वार्तांकन करणे किती महत्त्वाचे आहे हे प्रस्तुत शोधप्रबंधाच्या माध्यमातून लक्षात येते. तसेच गुन्हेगारी वृत्तीच्या लोकांना आळा कसा घालावा हे सुद्धा या शोधप्रबंधातून लक्षात येते.

१.३ संशोधनाची समस्या (Research Problem) :-

वर्तमानकाळातील भारतीय समाज जीवन मोठ्या प्रमाणात बदलत आहे. यातून वाढती गुन्हेगारी, वाढत्या शहरीकरणामुळे होताना दिसते. शिक्षण, सामाजिक, आर्थिक प्रगती मोठ्या प्रमाणात राजकीय स्पर्धा यामुळे गुन्हेगारी प्रवृत्तीत वाढ होत आहे. या गुन्हेगारीमुळे समाज स्वास्थ्य बिघडताना दिसत आहे. वृत्तपत्राच्या माध्यमातून गुन्ह्यासंदर्भातील वार्तांकन कशा पद्धतीने होते व त्याचा समाजजीवनावर काय परिणाम होतो याचा अभ्यास करण्यासाठी *'मराठी वृत्तपत्रातील गुन्हे वार्तांकनाचा समाजशास्त्रीय अभ्यास' (दै.लोकमत, दै.सकाळ, दै.महाराष्ट्र टाईम्सच्या विशेष संदर्भात)* हा विषय निवडला आहे.

सतत वाढणाऱ्या गुन्ह्याचे स्वरुप वर्तमानपत्राच्या माध्यमातून समाजासमोर येत आहे. गुन्हेगारीच्या वार्तांमुळे त्यातील अनेक सुक्ष्म पैलू समाजजीवनावर प्रभाव टाकत

आहेत. याचाच अभ्यास प्रस्तुत संशोधनात करण्यात येणार आहे. हे संशोधन मूल्यवर्धक ठरावे यासाठी सदरील शोधप्रबंधाच्या माध्यमातून प्रयत्न करण्यात येणार आहे.

१.४ संशोधनाची उद्दिष्ट्ये (Research Objectives) :-

कोणतेही सामाजिक संशोधन हे उद्दिष्टांवर अवलंबून असते. सुनिश्चित उद्दिष्टांमुळे त्या संशोधन कार्याला काळजीपूर्वक अभ्यासता येते. प्रा.पु.ल.भांडारकर यांच्या मते संशोधनासाठी कोणता विषय निवडला जाईल हे बऱ्याचअंशी संशोधनकर्त्याच्या मूल्याभिमुखतेवरही अवलंबून असते. कुठलेही संशोधन करत असताना त्या संशोधनाची उद्दिष्ट्ये सुस्पष्ट असणे अत्यंत गरजेचे आहे. संशोधन क्षेत्रातील विचारवंत प्रा.काचोळे व मुधोळकर म्हणतात, "सामाजिक शास्त्राच्या अभ्यासाचे उद्देश्य हे मानवी आशा, आकांक्षाशी निगडीत असतात. सामाजिक घटनांची मिमांसा करताना व्यक्तीच्या भावना, आशा-आकांक्ष व हेतू इत्यादींचा विचार करणे संशोधनाच्या दृष्टीने महत्त्वाचे असते." सदरील संशोधनाची उ्दिष्ट्ये पुढीलप्रमाणे निश्चित करण्यात आली आहेत.

१. गुन्हेगारी संदर्भातील वार्तांकनाला दैनिक सकाळ, दैनिक लोकमत व दैनिक महाराष्ट्र टाईम्स् या दैनिकात किती स्थान दिले जाते याचा शोध घेणे.

२. गुन्हेगारी संदर्भातील दैनिक सकाळ, दैनिक लोकमत व दैनिक महाराष्ट्र टाईम्स् या वृत्तपत्रातील वार्तांकनाच्या स्वरुप व प्रकारावर प्रकाश टाकणे.

३. गुन्हेगारी संदर्भातील दैनिक सकाळ, दैनिक लोकमत व दैनिक महाराष्ट्र टाईम्स् या वृत्तपत्रातील वार्तांकनाच्या सकारात्मक व नकारात्मक पैलूंचा अभ्यास करणे.

४. गुन्हेगारी संदर्भातील दैनिक सकाळ, दैनिक लोकमत व दैनिक महाराष्ट्र टाईम्स् या वृत्तपत्रातील वार्तांकनाच्या रचना, मांडणी व अध्ययनशैलीबाबत संशोधन करणे.

५. गुन्हेगारी संदर्भात दैनिक सकाळ, दैनिक लोकमत व दैनिक महाराष्ट्र टाईम्स् या वृत्तपत्रातील वार्तांकनाचा दर्जा सुधारण्यासाठी उपाययोजना करणे.

६. सामाजिकीकरणाच्या प्रक्रियेमध्ये दैनिक सकाळ, दैनिक लोकमत व दैनिक महाराष्ट्र टाईम्स् या वृत्तपत्रांच्या भूमिकेचा अभ्यास करणे.

७. गुन्हेगारी वार्तांमध्ये भयपट रंगवण्याकडे दैनिक सकाळ, दैनिक लोकमत व दैनिक महाराष्ट्र टाईम्स् या वृत्तपत्रांचा कल दिसतो का याचा शोध घेणे.

१.५ संशोधनाची गृहितके (Hypothesis of Research) :-

१. गुन्हेगारी संदर्भातील दैनिक सकाळ, दैनिक लोकमत व दैनिक महाराष्ट्र टाईम्स् या वृत्तपत्रातील वार्तांकनाचे स्थान निश्चित केले आहे.

२. दैनिक सकाळ, दैनिक लोकमत व दैनिक महाराष्ट्र टाईम्स् या वृत्तपत्रांतील गुन्हेगारी वार्तांचा विविध समाजघटकांवर परिणाम झाला आहे.

३. दैनिक सकाळ, दैनिक लोकमत व दैनिक महाराष्ट्र टाईम्स् या वृत्तपत्रातील गुन्हे वार्तांकन हे कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी पोलीस यंत्रणेलाही मार्गदर्शक ठरले आहे.

४. दैनिक सकाळ, दैनिक लोकमत व दैनिक महाराष्ट्र टाईम्स् या वृत्तपत्रातील गुन्हे वार्तांकनाला वृत्तपत्रात विशेष स्थान दिले आहे.

५. दैनिक सकाळ, दैनिक लोकमत व दैनिक महाराष्ट्र टाईम्स् या वृत्तपत्रातील गुन्हे वार्तांकनाचे स्वरूप हे अतिशयोक्त वा अवास्तव नाही असे दिसून आले आहे.

१.६ संशोधन पद्धती (Research Methodology):-

प्रस्तुत शोधप्रबंधाचा विषय 'मराठी वृत्तपत्रातील गुन्हे वार्तांकनाचा समाजशास्त्रीय अभ्यास' (दै.लोकमत, दै.सकाळ, दै.महाराष्ट्र टाईम्सच्या विशेष संदर्भात) हा अभ्यासविषय असून, सामाजिक प्रश्नांची उकल करण्यासाठी, गुन्हेगारी क्षेत्रातील सामाजिक संशोधन हे शास्त्रीय प्रक्रिया असून यातून सामाजिक प्रश्नांना दिशा मिळत असते. दैनिक सकाळ, दैनिक लोकमत आणि दैनिक महाराष्ट्र टाईम्स या वृत्तपत्रातील गुन्हे वार्तांकनासंदर्भातील शास्त्रीयदृष्ट्या प्रस्तुत शोधप्रबंधात अभ्यास केला आहे. प्रस्तुत शोधप्रबंध अभ्यासण्यासाठी वर्णनात्मक पद्धतींचा अवलंब करण्यात येणार आहे. सदरील संशोधन हे प्राथमिक व दुय्यम स्त्रोतांवर आधारीत आहे. प्रस्तुत शोधप्रबंधात सदरील विषयासंदर्भात उपलब्ध असलेले दैनिक व संदर्भग्रंथ, वृत्तपत्रीय कायद्यांचे ग्रंथ, विविध कमिट्याचे अहवाल, मासिके, साप्ताहिके, इंटरनेटवरील वेगवेगळ्या वेबसाईटस् इत्यादी माध्यमातून प्राप्त विविध अभ्यासपूर्ण लेख इत्यादी लिखित साहित्यांचा वापर प्रस्तुत शोधप्रबंधाच्या लिखाणासाठी करण्यात येणार आहे.

१.७ संशोधन साहित्याचा आढावा (Review of literature):-

सदरील संशोधन पूर्ण करण्यासाठी दैनिक लोकमत, दैनिक सकाळ व दैनिक महाराष्ट्र टाईम्स् इत्यादी वृत्तात्रांच्या संदभाने संदर्भग्रंथ, अप्रकाशित पीएच्.डी.प्रबंध इत्यादींचा येथे अभ्यास केल्या जाणार आहे.

१.८ प्रकरणांची आखणी :-

'मराठी वृत्तपत्रातील गुन्हे वार्तांकनाचा समाजशास्त्रीय अभ्यास' (दै.लोकमत, दै.सकाळ, दै.महाराष्ट्र टाईम्सच्या विशेष संदर्भात) या शीर्षकानुषंगाने केलेले लिखाण

अधिक सूत्रबद्ध होण्यासाठी लेखन करताना प्रस्तूत शोधप्रबंधाची विभागणी पुढील प्रकरणांद्वारे केली आहे.

प्रकरण पहिले : संकल्पना

प्रस्तुत प्रकरणात अभ्यास विषयाची पार्श्वभूमी स्पष्ट करण्यात येणार असून, त्यांनतर अभ्यासाची निकड व आवश्यकता यावर प्रकाश टाकण्यात येणार आहे तसेच पशर्वभूमी, महत्त्व, स्वरुप, व्याप्ती, यांची चर्चा करण्यात येणार अहे. त्यांनतर प्रमुख संकल्पना स्पष्ट करुन त्याच्या कार्यात्मक व्याख्यादेखील देण्यात येणार आहेत तसेच संशोधनाची उद्दिष्ट्ये स्पष्ट करण्यात येणार आहे. या अभ्यासासाठी गुन्हे वार्तांकन या सामग्रीची निवड करुन त्याचा अध्ययनासाठी विशेष घटक स्पष्ट करण्यात येणार आहेत. तसेच अभ्यासाचा संवादशास्त्रीय दृष्टिकोन स्पष्ट करुन पुढील अभ्यासाची दिशा ठरवणारे आहे. प्रस्तुत प्रकरण अभ्यासविषयाची पार्श्वभूमी स्पष्ट करणारे आहे.

प्रकरण दुसरे : संशोधन पद्धती :-

या प्रकरणामध्ये सामाजिक संशोधन, वृत्तपत्रीय विद्या संशोधक हे पैलू स्पष्ट करावयाचे आहेत. तसेच संशोधनाची गृहितके सांगून वर्णनात्मक संशोधन आराखडा का व कसा वापरला? हे सांगून त्यातील प्रमुख टप्पे स्पष्ट करावयाची आहेत. तसेच तथ्य संकलनाची साधने सांगून, प्राथमिक व दुय्यम साधनांवर प्रकाश टाकण्यात येणार आहे. सामाजिक सर्वेक्षण व आशय विश्लेषण या दोन प्रमुख पद्धतीवर येथे विशेष प्रकाश टाकण्यात येणार आहे, तसेच संशोधनाच्या मर्यादा सांगून संशोधन प्रणालीचे उपाययोजन करताना वार्तांकन कसे केले आहे हे नमूद करण्यात येणार आहे.

प्रकरण तिसरे : गुन्हे वार्तांकनाचे आशय विश्लेषण

प्रस्तुत प्रकरणामध्ये संशोधनासाठी निवडलेल्या दैनिक सकाळ, दैनिक लोकमत, दैनिक महाराष्ट्र टाईम्स या तिन वृत्तपत्रांच्या गुन्हेगारी वार्तांकनाचे आशयविश्लेषण सादर करावयाचे आहे. या गुन्हेगारी वार्तांकनाचे सहा प्रमुख प्रकार पाडावयाचे असून, त्यामध्ये वृत्तपत्रांनी किती जागा दिली हे देखील पहावयाचे आहे. या सर्वांचे तौलनिक अध्ययन करताना एका आठवड्याचा अभ्यास, एका महिन्याचा अभ्यास आणि वर्षभरातील अंकांचा अभ्यास करण्यात येणार आहे. प्रत्येक प्रकारातील एका उत्तम बातमीचा नमूना अभ्यासासाठी निवडावयाचा आहे. तसेच शेवटी तालिका व आलेखांच्या आधारे घटक निहाय अनुमान काढण्यात येणार आहे व शेवटी यश आणि अपयशाबद्दल निदान करावयाचे आहे.

प्रकरण चौथे : सामाजिक पाहणीचा अहवाल

प्रस्तुत प्रकरणामध्ये नांदेड शहरातील ३०० नागरिकांचे गुन्हे वार्तांकनाबाबत सामाजिक सर्वेक्षण करावयाचे आहे. त्यासाठी २५ प्रश्नांची प्रश्नावली तयार करुन त्याचा उपयोग करावयाचा आहे. त्या आधारे प्राप्त होणाऱ्या माहितीचे तालिका व आलेखात रूपांतर करुन त्यावर भाष्य करावयाचे आहे आणि या अध्ययनाला अंतिम रुप देताना तालिका व आलेख देऊन समाजशास्त्रीय दृष्टिने या पाहणीचे अवलोकन करुन परस्पर अनुबंध ठरवून शेवटी अनुमान काढावयाचे आहेत.

प्रकरण पाचवे : सामाजिक परिणामाचे अध्ययन

दै.लोकमत, दै.सकाळ व दै.महाराष्ट्र टाईम्स या वृत्तापत्रांत गुन्हे वार्तांकनास किती स्थान दिले जाते व त्याचा सामाजिक परिणाम काय होतो याबाबत शास्त्रीय अध्ययन करण्यात येणार आहे. तसेच हे अध्ययन करताना समाजजीवनातील विविध प्रवाह,

समस्या, उपाययोजना यांचीही दखल घ्यावयाची आहे. गुन्हे वार्तांकनाचा दर्जा सुधारण्यासाठी काही उपाय देखील सुचवायचे आहेत. हे अध्ययन उपरोक्त दोन प्रकरणांचा आढावा घेणारे व मूल्यमापन करणारे आहे.

प्रकरण सहावे : निष्कर्ष व उपसंहार

या प्रकरणात प्रथम प्रकरणाचा सारांश देण्यात येईल त्यानंतर ठळक निष्कर्ष मांडून शिफारशी करण्यात येतील. नवी सैद्धांतिक मांडणी करून त्याआधारे अभ्यास विषयाचे नव्याने शास्त्रीय विश्लेषण करण्यात येईल.

संदर्भसूची सोबत जोडण्यात येईल.

संदर्भसूची :-

१. लेले रा.के., "वृत्तपत्रांचा इतिहास", कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, १९८५.

२. माळी सुनिल, "बातमीदारी", राजहंस प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, २०१२.

3. Hohenberg John, "The Professional Journalist", Newyork, 1978.

४. धारूरकर वि.ल., "आजकालची पत्रकारिता", रामराज्य प्रकाशन, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती, १९८४.

५. दैनिक लोकमत, वर्धापनपन दिन विशेषांक पुरवणी.

६. दैनिक सकाळ, वर्धापनदिन विशेषांक पुरवणी.

७. दैनिक महाराष्ट्र टाईम्स, विशेषांक

८. घाटोळे रा.ना., "समाजशास्त्रीय संशोधन : तत्त्वे व पद्धती", मंगेश प्रकाशन, नागपूर.

९. आगलावे डॉ.प्रदीप, "संशोधन पद्धती व तंत्रे", विद्या प्रकाशन, नागपूर, २००१.

१०. भांडारकर पू.ल., "सामाजिक संशोधन पद्धती", महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ, नागपूर.

११. काचोळे डॉ.दा.धों.,मुधोळकर ज.रा., "सामाजिक संशोधन पद्धती", कैलास प्रकाशन, औरंगाबाद, २००५.

12. Gisbert P., "Fundamentals of Sociology", Orient Longmen, New Delhi, 1993.

13. Gerald Edward, "The Social Responsibility of the Press", East-West Centre, Honolulu, 1963

14. McQial Denis, "Towards Sociology of Mas Communication", Sage, London.

संशोधक
शुद्धोधन शंकरराव एडके

मार्गदर्शक
डॉ.राजेंद्र नारायणराव गोणारकर
सहयोगी प्राध्यापक, माध्यमशास्त्र संकुल,
स्वा.रा.ती.म.विद्यापीठ, नांदेड